# —:प्रेस नोट:—

## अति संवेदनशिल नक्षलग्रस्त भागात पेड्डीगुडम वन विभागातील वन परिक्षेत्र अधिकारी, वनरक्षक व खाजगी इसमावर लाच—लुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली ची कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | गडचिरोली |
| पोलीस ठाणे, अप क्रं. दाखल दिनांक व वेळ | पो. स्टे मुलचेरा अप क्र. ८७ /२०२६<br>दिनांक १९/०६/२०२६ वेळ १६.०० वा |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव व पद | १) श्रीनिवास मदनय्या कटकू, वय ५२ वर्षे, वनपरीक्षेत्र अधिकारी (RFO), वन परीक्षेत्र पेड्डीगुडम (वर्ग २)रा. भगतसिंग रोड, रोड क्र. ८, मंचेरीअल, तेलंगाणा, ह.मु. मुलचेरा वन विश्रामगृह,ता . मुलचेरा जि. गडचिरोली<br>२) नितेश पांडुरंग मडावी, वय ३७ वर्षे, वनरक्षक (वर्ग३),रा. नांदेड, ता. नागभिड, जि. चंद्रपूर,<br>३) प्रदीप गणेश मंडल, वय ५० वर्षे, रा.गणेशनगर पो. मुलचेरा.ता. मुलचेरा,जि. गडचिरोली—खाजगी व्यक्ती |
| कायदा कलम | कलम—७, ७ (अ), १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३ लाख रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५० हजार रूपये |

थोडक्यात हकिकत

गडचिरोली जिल्हयातील अति संवेदनशिल नक्षलग्रस्त भागात वन विभागाच्या वन परीक्षेत्र अधिकारी आरोपी क्र. १ श्रीनिवास कटकू यांचे करीता यातील आरोपी क्र. २ नितेश मडावी यांनी ३ लाख रूपयांची मागणी केल्याने व खाजगी इसम आरोपी क्र. ३ प्रदीप मंडल यांचे मार्फतीने तडजोडी अंती ५० हजार रुपयांची लाच रक्कम त्यांचे गाव मौजा गणेशपूर— मुलचेरा रोडवर स्विकारतांना अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार यांचे वर दिनांक ११/०६/२०२६ रोजी अवैध सागवण लाकूड बाळगल्यावरून पेड्डीगुडम वनविभाग अंतर्गत वन गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यावरून तक्रारदार यांचेकडे असलेले फर्निचर विक्रीचे लायसन्स रद्द करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास न पाठविणे करीता दिनांक १७/०६/२०२६ रोजी आरोपी क्र. २) नितेश मडावी यांनी वन परीक्षेत्र अधिकारी श्रीनिवास कटकू यांचे करीता तक्रारदारास आरोपी क्र. १) यांचे निर्देशानुसार लाचेची मागणी केली. दिनांक १८/०६/२०२६ रोजी यातील आरोपी क्र. १ वन परीक्षेत्र अधिकारी श्रीनिवास कटकू यांनी स्वत: करीता ३ लाख रूपयांची मागणी करून त्यापैकी पहीला हप्ता ५०,०००/— रू. आरोपी क्र. ३) खाजगी इसम — प्रदीप मंडल यांचेकडे देण्यास सांगीतले. त्यावरून दिनांक १९/०६/२०२६ रोजी आरोपी क्र. ३) हे तक्रारदाराकडुन आरोपी क्र. १) यांचे करीता ५०,०००/— रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ मिळून आल्याने आरोपी क्र. १) श्रीनिवास मदनय्या कटकू, वय ५२ वर्षे, वनपरीक्षेत्र अधिकारी (RFO), वन परीक्षेत्र कार्यालय पेड्डीगुडम स्थित मुलचेरा, ह.मु. मुलचेरा ता . मुलचेरा जि. गडचिरोली आरोपी क्र. २) नितेश पांडुरंग मडावी, वय ३७ वर्षे, वनरक्षक वन परीक्षेत्र कार्यालय पेड्डीगुडम स्थित मुलचेरा रा. ह.मु. मुलचेरा ता . मुलचेरा आरोपी क्र. ३) प्रदीप गणेश मंडल, वय ५० वर्षे, रा. गणेश नगर पो. मुलचेरा. ता. मुलचेरा, जि. गडचिरोली — खाजगी व्यक्ती यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम अप. क्र. ८७ /२०२६ कलम—७, ७ (अ), १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१) सापळा अधिकारी :— पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे, ला.प्र.वि. गडचिरोली

२) पर्यवेक्षण अधिकारी :— पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे, ला.प्र.वि. गडचिरोली

३) सापळा पथक :— पोहवा किशोर जौंजारकर, पोहवा राजेश पदमगिरीवार, पोहवा स्वप्नील बांबोळे, पो.अ. संदिप घोरमोडे, पो.अ. प्रविण जुमनाके, पो.अ. संदिप उडाण, पो.अ. हितेश जेट्टीवार, पो.अ. नुतेश धुर्वे, मपोशि विद्या म्हशाखेत्री, व चापोहवा राजेश्वर कुमरे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली

४) तपासी अधिकारी:— पोलीस निरीक्षक श्री. किरण बगाटे, ला.प्र.वि. गडचिरोली

**मार्गदर्शन अधिकारी :—**

१) मा. डॉ. श्री.दिगंबर प्रधान, पोलीस अधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपुर परीक्षेत्र

२) मा. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर

३) मा. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशीर फी व्यतीरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी संपर्क साधावे असे आवाहन, पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे यांनी केले आहे.

पोलीस उपअधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय गडचिरोली
मोबाईल/व्हॉटसअ‍ॅप क्रमांक— ७५८८०४१०६४
दुरध्वनी क्रमांक — ०७१३२—२९५०२० टोल फ्रि क्रमांक — १०६४

(विक्रांत सगणे)
पोलीस उप-अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
गडचिरोली.